महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार , मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र .०२२ २२७९३०५३. Email ID : -napu12.mhpds@gov.in

---

क्रमांक : संकिर्ण १०१४/प्र.क्र.१७६(भाग-१)/नापु-१२, दिनांक :- ३० एप्रिल २०२१.

प्रति,

आयुक्त,
महाराष्ट्र लोक सेवा हक्क आयोग,
मुबई ४०००३२.

विषय : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांची बृहत यादी (Master List ) सादर करणे बाबत.

संदर्भ : मा.राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त मुंबई,याचे अ.शा.पत्र क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.४४/मुसेहआ, दि.०९ ऑगस्ट २०१९ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत जनतेस पुरविण्यात येणा-या अधिसूचित सेवा, अ) अन्न,नागरी पुरवठा प्रभाग आणि ब) ग्राहक संरक्षण प्रभाग अशा दोन प्रभागात निश्चित केलेल्या आहेत.

अ) विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण १०१४/१३०६/प्र.क्र.१७६/नापु.१२ दि.२२ जून, २०१६ व अधिसूचना दि.१४.१० २०१५ नुसार अन्न,नागरी पुरवठा प्रभागाच्या खालील सेवा अधिसूचित केलेल्या आहेत.

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सेवांची बृहद यादी**

**विवरणपत्र -अ**

| अ.क्र. | अन्न, नागरी पुरवठा प्रभागाच्या अधिसूचित केलेल्या सेवा |
|---|---|
| १ | नवीन शिधापत्रिका मागणी |
| २ | i ) शिधापत्रिकेतील नावात दुरुस्ती.<br>ii) शिधापत्रिकेत नावे सामाविष्ट करणे/नावे वाढविणे.<br>iii) शिधापत्रिकेतील नाव कमी करणे.<br>iv) शिधापत्रिकेवरील पत्ता बदल करणे |
| ३ | i) दुय्यम शिधापत्रिका (खराब/फाटलेली इ. )<br>ii) दुय्यम शिधापत्रिका ( गहाळ शिधापत्रिका ) |



Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| ४ | नवीन रास्तभाव दुकानाची मंजूरी |
| ५ | रास्तभाव दुकानाच्या परवाण्याचे नुतनीकरण |
| ६ | किरकोळ रॉकेल विक्री परवाने. |
| ७ | किरकोळ रॉकेल विक्री परवान्याचे नुतणीकरण |

ब) ग्राहक संरक्षण प्रभागाच्या अधिसूचित केलेल्या सेवा शासन निर्णय क्र.संकीर्ण १०१४/१३०६/ प्र.क्र.१७६/नापु.१२ दि. २०.०९.२०१६ व अधिसूचना दि.३१.०८.२०१६ तसेच २५.१०.२०१६ नुसार खालील सेवा अधिसूचित केलेल्या आहेत.

विवरणपत्र-ब

| अ.क्र. | ग्राहक संरक्षण प्रभागाच्या अधिसूचित केलेल्या सेवा |
|---|---|
| १ | वजने-मापे उत्पादकांना परवाना |
| २ | वजने-मापे उत्पादक परवाना नुतनी करण |
| ३ | वजने-मापे विक्रेत्यांना परवाना |
| ४ | वजने-मापे विक्रेता परवाना नुतनीकरण |
| ५ | वजने-मापे दुरूस्तकांना परवाना. |
| ६ | वजने-मापे दुरूस्तक परवाना नुतनीकरण. |
| ७ | आवेष्टित वस्तुंचे उत्पादक/आवेष्टक यांची नोंदणी . |
| ८ | नामनिर्देन नोंदणी प्रमाणपत्र. |
| ९ | वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ अंतर्गत वजन व मापे यांचे मुद्रांकन, पडताळणी व प्रमाणपत्र देणे. |

तसेच काही सेवा नियंत्रणात्मक स्वरूपाच्या असल्याने तसेच या सेवांच्या अंमलबजावणीचे स्वरुप विचारात घेता (जनतेस थेट देण्यात येत नसणे,या सेवांचे स्वरूप अर्धन्यायिक स्वरूपाचे असणे ) या सेवा लोकसेवा अधिनियमांच्या कक्षेत अंर्तभूत करणे संयुक्तिक होणार नाही.

| अ.क्र. | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण प्रभागाच्या अधिसूचित न केलेल्या सेवा |
|---|---|
| १ | वजन माप उत्पादक,दुरूस्तक,विक्रेते यांच्या गैरवर्तणुकी विरूध्दच्या तक्रारी. |
| २ | कार्यालयीन/शिबीर कार्यालयातील वजन मापाच्या पडताळणी बाबत. |
| ३ | वजन माप विषयक तरतुदीच्या भंगाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी व त्या अनुषंगाने व्यापक कार्यवाही. |
| ४ | कनिष्ठ कार्यालयांच्या आदेशा विरूध्दच्या अपीलाबाबतची संपुर्ण कार्यवाही. |
| ५ | अर्धन्यायिक कामकाज . |

उपरोक्त विवरण पत्र "अ" व "ब"मधील एकूण (७+९=१६) या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विभागाने अधिसूचित केलेल्या आहेत.

( सु.बं.तुंगार )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : १. कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२.
२. निवडनस्ती /नापु-१२



Scanned with CamScanner